**तीळाचे महत्वाचे रोग :**

पर्णगुच्छ ह्या रोगाचा प्रादुर्भाव मायकोपणामुळे प्रामुख्याने फुले येण्याचे वेळी होत असल्यामुळे तीळ उत्पादनाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या रोगाचा प्रसार तुडतुड्याद्वारे होत असल्यामुळे तुडतुड्याचे नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही ५०० मि.ली. किंवा थायोमटान २५ टक्के प्रवाही ५०० मि.ली. किंवा मिथॉल डीमेटॉन २५ टक्के प्रवाही ४०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारावे.

**मररोग :**

मुळ कूजणे व खोड कुजणे हा रोग पाणी साचणाऱ्या जमिनीत बुरशीमुळे होतो म्हणून या पिकात पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच बीज प्रक्रिया करतांना बावीस्टीन २ ग्रॅम प्रति किलो किंवा कॅप्टन २ ग्रॅम प्रति किलो वापरल्याने या रोगाचे नियंत्रण होते.

**कापणी व मळणी :**

खरीप पिकाची कापणी पक्वतेनुसार करावी. कापणी अगदी वेळेवर करणे आवश्यक आहे. झाडाची पाने गळून बोंडे पक्व झाली की पीक कापण्यास तयार झाले आहे असे समजावे.

**साठवण :**

तीळात कीड लवकर होते.त्यामुळे तीळ चांगले वाळवून स्वच्छ करातात, व्यवस्थित साठवून ठेवावे. साठवण करतांना जर दुर्लक्ष झाले तर किडी तीळ खातात आणि तिळाचा फक्त भुगाच शिल्लक राहतो.

**उत्पन्न :**

तिळाचे उत्पन्न पेरणीची वेळ, खतांची मात्रा आणि हेक्टरी झाडांची संख्या यावर अवलंबून असते वरील लागवडीची पध्दत व सुधारित जाती वापल्यास हेक्टरी ५ ते ६ क्विंटल/ हेक्टर उत्पन्न मिळू शकते.

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र. २१९६/२०१८

**प्रकाशक**

**डॉ. किरण कोकाटे**

संचालक, विस्तार शिक्षण,

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**अर्थ सहाय्य**

**प्रकल्प संचालक,**

आत्मा धुळे

**सह-संपादक**

**डॉ. पंडित खर्डे**

प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र,

म.फु.कृ.विं., राहुरी

**संपादक**

**डॉ. पंकज पाटील**

वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

कृषि विज्ञान केंद्र, धुळे

# तीळ उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान



**लेखक**

**श्री. जयराम म. गावित**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

**श्री. काथेपूरी जगदीश**
शास्त्रज्ञ (कृषिविद्या)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

**श्री. रोहित व्हि. कडू**
शास्त्रज्ञ (उद्यानविद्या)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१९६/२०१८

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**

**कृषि विज्ञान केंद्र,**

कृषि महाविद्यालय, धुळे-४२४००४

दुरध्वनी क्रं. (०२५६२)२३०३६२

संकेतस्थळः http://www.kvkdhule.org

*E-mail* : pckvkdhule@gmail.com
pckvkdhule@rediffmail.com

# तीळ उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान

तीळाचे उगमस्थान भारत आहे. पूर्वीपासून तीळाचा उपयोग फक्त धार्मिक विधीसाठी व सणासुदीसाठी केला जातो. पण सध्याच्या तेल टंचाईच्या काळात या पिकापासून मिळणाऱ्या तेलाचे उपयोग खाद्यतेल म्हणून फार मोठ्या प्रमाणात केला जातो आहे. भारतात उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र , कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू या राज्यात हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

**जमिन :** या पिकास मध्यम ते भारी, पाण्याचा चांगला निचरा असलेली जमिन निवडावी.

**पूर्वमशागत :** तीळाचे मुख्य मुळ ६० ते ९० से.मी. खोल जाते.त्याला जमिनीच्या पृष्ठ भागाजवळ असंख्य शाखा व उपशाखा फुटतात. या पिकासाठी एक उभी आडवी नांगरणी करावी. ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी.

**हवामान व पेरणी :** तीळाची योग्य वेळी पेरणी करणे फायदेशीर असते. तीळ हे अत्यंत नाजूक पीक आहे. अशीच तीळाची पेरणी जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून ते जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत तर उन्हाळ्यामध्ये फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवाड्यापर्यंत पूर्ण करणे अधिक उत्पादनासाठी आवश्यक आहे . बियाण्याच्या चांगल्या उगवणीसाठी दैनंदिन किमान उष्णतामान

१५$^0$ से. तर चांगल्या वाढीसाठी २१$^0$ से ते २६$^0$ से व फलधारणेसाठी २६$^0$ ते ३२$^0$ से.मी. आणि रात्री थंड हवा असतांना पिकांची चांगली वाढ होते.

हे पीक पेरतांना दोन ओळीमध्ये ३० से.मी. अंतर असलेल्या पाभरीने हेक्टरी २.५० किलो (एकरी १ किलो) बी पेरावे. पेरणीपूर्वी एक किलो बी पेरावे. पेरणीपूर्वी एक किलो बियाण्यास २ ते ३ ग्रॅम थायरम किंवा कार्बेन्डेझीम चोळावे. सलग पीक पेरतांना त्यात वाळू मिसळून पाभरीने पेरावे. त्यामुळे ते सारख्या प्रमाणात पडते. पेरणी करतांना दोन रोपातील अंतर १५ से.मी. राहील व बियाणे जमिनीत ३ से.मी. खोलीवर पडेल. त्याची काळजी घ्यावी. उन्हाळी तिळाची पेरणी करतांना दोन रोपातील अंतर ५ से.मी. ठेवावे. हेक्टरी ३-४ किलो बियाणे पेरणी करिता वापरावे.

**खत व्यवस्थापन :** तीळ पिकासाठी हेक्टरी ५० किलो नत्र २५ किलो स्फुरद याप्रमाणे खताच्या मात्रा द्याव्यात. सोबत सल्फरचा ८ किलो प्रति हेक्टर वापर करावा. नत्राची मात्रा दोन हप्त्यात द्यावी. पहिला हप्ता २५ किलो नत्र आणि स्फुरदाची पूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी द्यावी. दुसरा हप्ता २५ ते ३० दिवसांनी किंवा विरळणी नंतर ३ आठवड्यांनी द्यावा.

**आंतरमशागत :** १) या पिकास आवश्यतेनुसार दोन कोळपण्या कराव्यात तसेच दोन तीन खुरपण्या कराव्यात.

**विरळणी :** झाडांची संख्या योग्य ठेवण्यासाठी तीळाची विरळणी करणे महत्वाचे असते. बी उगवल्यानंतर १० दिवसांनी पहिली विरळणी करावी. त्यानंतर २०-२५ दिवसांनी दुसरी विरळणी करावी.

**खरीप हंगाम लागवडीकरीता मुगाच्या जाती :**

| जाती | कालावधी (दिवस) | उत्पादन (क्विं./हे) | वैशिष्टे |
|---|---|---|---|
| फुले तीळ नं. १ | ९०-९५ | ५००-६००४ | पांढरा टपोरा दाणा, अर्ध रब्बी हंगाम सोडून संपूर्ण महाराष्ट्रा-साठी शिफारस |
| तापी (जे.एल.टी. ७) | ८०-८५ | ६००-७०० | पांढरा दाणा, खान्देश व मराठ-वाड्यातील जालना व औरंगाबाद जिल्ह्यातील क्षेत्र |
| पद्मा (जे.एल.टी. २६) | ७२-७८ | ६५०-७५० | पिक्कट, तपकरी दाण्याचा रंग, लवकर येणारी व दुपारपीक लागवडीस योग्य जळगांव, धुळे, बुलढाणा व अकोला जिल्ह्यातील क्षेत्र. |
| (जे.एल.टी. ४०८) | ८१-८५ | ७५०-८०० | पांढरा दाणा, मध्यम कालावधीत अधिक उत्पादनक्षम, तेलाचे प्रमाण जास्त, हमखास पाऊस पडणाऱ्या खान्देश व लगतच्या विदर्भ व मराठवाडा विभागातील क्षेत्रकरीता खरीप हंगामासाठी. |

**तीळावरील महत्वाची कीड :** तीळाच्या पिकाला पिवळी किंवा काळी माशी, गादमाशी, पाने खाणारी अळी, पाने गुंडाळणारी अळी, तिळातील कळ्या पोखरणारी अळी या किडीचा प्रादुर्भाव होतो.

**तीळावरील कीडीचे नियंत्रण :**

१. तीळ वाढीच्या सुरुवातीच्या काळातील किडीच्या नियंत्रणासाठी फोरेट १० जी १० किलो प्रति हेक्टरी मातीत मिसळून द्यावे.

२. तीळावरील पाने गुंडाळणारी अळी, पाने खाणारी अळी, यांच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. १००० मि.ली. ५० लिटर पाण्यात मिसळून फवारले असता या माशीचे चांगले नियंत्रण होते.

३. गाद माशीच्या नियंत्रणासाठी पीक फुलावर आले असतांना क्विनॉलफॉस २५ ई.सी. १००० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारले असता या माशीचे नियंत्रण होते.